स. फौजदारी खटला क्र. ३८०/२०२४
सरकार विरूद्ध दिनकर
**निशाणी १२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : गजानन पांडुरंग मेटकर,
वय : ४२ वर्षे,
धंदा : शेती काम,
राहणार : खैरखेड, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी फिर्यादी संतोष भांबेरे यास ओळखतो. मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलीसांची लिखापढी चालू होती. मी त्या पंचनाम्यातील लिखापढी वर सही केली होती. आता मला पंचनामा दाखवला त्यावर माझी सही आहे. परंतू, त्या पंचनाम्यातील मजकूर मी वाचला नव्हता.

(***साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली***.)

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/१२/२०२३ रोजी अकोट अकोला रोडवर दिप गावंडे यांच्या शेता जवळ पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४/१२/२०२३ दिप गावंडे यांचया शेताजवळ अकोट अकोला रोडवर पोलीसांनी मला पचंनामा वाचून दाखवला व त्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याने मी त्यावर सही केली होती. सदर पंचनाम्यास **निशाणी १३** देण्यात येते.

**उलटतपासणी** — आरोपीतर्फे श्री. जी. के. टिकार यांचे मार्फत.

P.T.O

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK060009022024-orderno-3.pdf
www.ecourtsindia.com

३.  फिर्यादी हा माझा चांगला ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनामा निशाणी १३ मध्ये काय लिहीले आहे हे मला माहिती नाही व फिर्यादीने सांगितले म्हणून मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी रस्त्याने जात आसतांना फिर्यादीच्या सांगण्यावरून पंचनामा निशाणी १३ वर सही केली. उलटतपास पूर्ण.

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २८.०४.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोट
ता. आकोट, जि. अकोला.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK060009022024-orderno-3.pdf

www.ecourtsindia.com

www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com



**SCC No. 380/2024**
**Evidence/Exh. 12**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence is same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 28/04/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 28/04/2025. |
| Evidence Uploaded on | : | 29/04/2025. |

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK060009022024-orderno-3.pdf